# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांकः03.07.2024** **वारःबुधवार**

---

1. हाथरस इथं संत्संगातल्या चेंगराचेंगरीत 121 जणांचा मृत्यू, आयोजक बाबा अद्याप फरार
2. काँग्रेसकडून घटना, आरक्षण मुद्द्यांवर चुकीच्या माहितीद्वारे देशवासियांची दिशाभूल-पंतप्रधानांची टिका
3. रशिया 2033 पर्यंत अंतराळात स्वतंत्र  स्थानक निर्माण करणार आणि
4. ग्लोबल इंडिया कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेला आजपासून नवी दिल्ली इथं प्रारंभ

**हाथरस दुर्घटना**

उत्तर प्रदेशातील हाथरस जिल्ह्याच्या एका गावात सुरू असलेल्या भोंदू बाबाच्या सत्संगात काल चेंगराचेंगरी होऊन झालेल्या दुर्दैवी अपघातातल्या मृतांची संख्या वाढली असून 121 झाली आहे. तर 28 जण गंभीर असून त्यांच्यावर अलिगढमध्ये उपचार सुरू असल्याची माहिती अलिगढ विभाग आयुक्त चैत्रा बी यांनी दिली आहे. या सत्संगासाठी सरकारी परवानगी घेतल्याची माहितीही त्यांनी दिली. आज मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ हाथरसला भेट देणार असून, घटनास्थळी पाठवलेल्या अधिकारी आणि मंत्र्यांच्या ते सातत्याने संपर्कात आहे. योगी आदित्यनाथ यांनी काल लखनौ इथं वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेऊन घटनेची माहिती घेतली होती.

हाथरस जिल्ह्यातल्या सिकंदराराऊ तालुक्यातल्या रतिभानपूर मुघलघरी या गावात हा सत्संग सुरू होता. अपघातातल्या मृतांना राज्य आणि केंद्र सरकारकडून मदत सर्वोपरी सहाय्य केलं जात आहे. मुख्यमंत्री सहायता निधीतून मृतांच्या कुटुंबियांना प्रत्येकी दोन लाख तर जखमींसाठी पन्नास हजार रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. तर पंतप्रधानांनीही तेवढीच मदत जाहीर केली आहे. आग्र्याचे अतिरिक्त पोलिस महासंचालक आणि अलिगढ चे आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली तपासपथक हाथरसला रवाना झाले असून, अपघाताची कारणं शोधून 24 तासांच्या आत अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. आयोजक भोंदू बाबा फरार आहे.

**अभिभाषण उत्तर**

लोकसभेच्या दोन्ही सदनाच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या अभिभाषणाला उत्तर देताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर टीका केली. अग्निवीर आणि किमान आधारभूत किंमत या मुद्द्यांवर ते सभागृहाची दिशाभूल करत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. राहुल गांधी भ्रष्टाचाराच्या प्रकरणात जामीनावर बाहेर आले असून, इतर मागासवर्गीय समाजाचा अपमान केल्याप्रकरणी दोषी आढळले असल्याचं सांगून, काँग्रेस नेत्यावर अनेक बदनामीचे खटले सुरू असल्याचं मोदी म्हणाले. लोकसभा निवडणुकीत लोकांना घटना, आरक्षण या मुद्द्यांवर चुकीची माहिती पसरवून लोकांची दिशाभूल करण्याविषयी पंतप्रधानांनी काँग्रेसवर टीका केली. काँग्रेसनं त्यांच्या आर्थिक धोरणांतून अनागोंदी माजवली तसंच जात, धर्म यावर आधारित फुटीचं राजकारण केलं. एखाद्या समुदायावर खोटे आरोप करण्याचे षडयंत्र काँग्रेसकडून रचलं जात असल्याची बाब गंभीर असून, काँग्रेसच्या या संस्कृतीला चोख प्रत्युतर दिलं जाईल असा इशाराही मोदी यांनी यावेळी दिला. काँग्रेसच्या राजवटीत लष्कराकडे बुलेट प्रूफ जॅकेटही नव्हती असा आरोप करत मोदी यांनी काँग्रेस राजवटीतल्या बोफोर्स घोटाळा, पाणबुडी खरेदीतील अनियमितता यांच्याकडे लक्ष वेधले. या सर्व ढिल्या कारभारामुळे सशस्त्र दलांच्या सुधारणेत अडथळा निर्माण झाल्याचं मोदी यांनी नमूद केलं.

**<u>पेपर फुटी-मोदी</u>**

देशातल्या प्रश्नपत्रिका फुटी प्रकरणी सरकार गंभीर असून दोषींना शिक्षा होईल अशी ग्वाही काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल लोकसभेत दिली. यासाठी युद्धपातळीवर पावले उचलली जात असल्याचं ते म्हणाले. दोन्ही सदनाच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभाराच्या प्रस्तावाला उत्तर देताना ते बोलत होते. नीट परीक्षेसंदर्भात देशभरातून संशयितांना ताब्यात घेतलं असून, ही प्रक्रिया अधिक सुरक्षित करण्यसाठी पावलं उचलली जात असल्याचेही त्यांनी सांगितले. अशा धोक्याच्या प्रसंगांचा सामना करण्यासाठी सरकारने यापुर्वीच एक भक्कम कायदा आणला असल्याची माहितीही त्यांनी दिली.

**<u>लोकसभा संस्थगित</u>**

18 व्या लोकसभेचं पहिलं अधिवेशन काल संपल्यानंतर लोकसभेचं कामकाज संस्थगित करण्यात आलं. दोन्ही सदनाच्या संयुक्त बैठकीत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभाराचा प्रस्ताव पारीत झाल्यानंतर लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी याबाबत घोषणा केली. या सत्रादरम्यान 103 टक्के कामकाज झाल्याची नोंद झाली असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. या अधिवेशनात 539 सदस्यांनी शपथ घेतली. संसदेचे अधिवेशन 24 जूनला बोलवण्यात आले होते.

**<u>रशिया ऑरबिटल स्थानक</u>**

रशियाने आगामी 2033 पर्यंत अंतराळात रशियन अंतराळ स्थानक अर्थात ऑर्बिटल स्टेशनच्या निर्मितीसाठी मान्यता दिली असून त्यासाठीचं कालबद्ध वेळापत्रक मंजूर करण्यात आलं आहे. आहे. रशियाच्या केंद्रीय अंतराळ महामंडळ 'रॉसकॉसमॉस'नं याबाबतचं एका निवेदन प्रसिद्ध केलं असून त्यामध्ये याविषयीची माहिती देण्यात आली आहे. या कालबद्ध कार्यक्रमात अंतरिक्ष स्थानकांच्या नमुना प्रतिकृतींची आखणी, रचना आणि प्रत्यक्ष उभारणी, मानवासहित अंतराळ यानाच्या उड्डाण चाचण्या, अंतराळ यनाची निर्मिती आणि पृथ्वीवर त्यासाठीच्या आवश्यक पायाभूत सुविधांची उभारणी इत्यादी बाबींचा समावेश आहे.

**<u>हरिकेन बेरील</u>**

बेरील चक्रीवादळ कॅरिबियन भागात धडकलं असून त्यामुळे किमान सहा लोकांचा बळी गेला आहे. वादळामुळे झालेलं नुकसानही मोठं आहे. राष्ट्रीय चक्रीवादळ केंद्रानं दिलेल्या माहितीनुसार, श्रेणी 4 प्रकारचं हे चक्रीवादळ असून ते ताशी 155 मैल वेगानं जमैकाच्या दिशेने जात आहे. त्यामुळे आज जमैका आणि केमनबेटांच्या काही भागांमध्ये वेगवान वारे, वादळी हवामान आणि विनाशकारी लाटा अपेक्षित आहेत. त्यासाठी काळजी घेण्याची सूचना आणि इशारा देण्यात आला आहे. बेरील चक्रीवादळामुळे विश्वविजेत्या भारतीय पुरुष क्रिकेट संघाचा बार्बाडोस इथून परतीचा प्रवास लांबणीवर पडला आहे. पूर्वनियोजित कार्यक्रमानुसार हा संघ काल संध्याकाळी बार्बाडोस इथून निघणार होता. पण त्यांना चक्रीवादळामुळे हॉटेलमध्ये थांबावं लागलं.

**<u>एआय-शिखर बैठक</u>**

ग्लोबल इंडिया कृत्रिम बुद्धिमत्ता शिखर परिषदेला आज नवी दिल्ली इथं प्रारंभ होत असून त्याचं उद्घाटन इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांच्या हस्ते होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्राचा प्रत्यक्ष वापर, त्याचे प्रशासन, त्यासाठीच्या बुद्धीकौशल्याचा विकास आणि या विषयातील नवोन्मेष कल्पनांना चालना देणं अशा विविध पैलूंवर सखोल चर्चा होणार आहे. जागतिक स्तरावर जबाबदार कृत्रिम बुद्धिमत्ता विकासाला चालना देण्याचीआपली वचनबद्धता भारतानं यापूर्वीच अधोरेखित केली असून त्या दृष्टीनं ही शिखर परिषदभारतासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

**<u>रेल्वे माल</u>**

भारतीय रेल्वेने या वर्षीच्या जून महिन्यात मालवाहतुकीतून 14 हजार 798 कोटी रुपयांची कमाई केली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ती 11 टक्क्यांनी ती अधिक आहे. रेल्वे मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, गेल्या वर्षीच्या जून महिन्यात सुमारे 123 दशलक्ष टन माल वाहतुकीच्या तुलनेत जूनमध्ये 135 दशलक्ष टनांपेक्षा जास्त माल वाहतूक झाली आहे. रेल्वेने 60 दशलक्ष

टन कोळसा, 15 दशलक्ष टनांहून अधिक लोह खनिज, 7 दशलक्ष टन सिमेंट आणि 4 दशलक्ष टनांहून अधिक अन्नधान्य वाहतूक केली.

**<u>शिष्यवृत्ती</u>**

येत्या वर्षाच्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातल्या विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना परीक्षेसाठी राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलनं नोंदणी सुरू केली आहे. शिक्षण मंत्रालयानं दिलेल्या माहितीनुसार, या पोर्टल नवीन नावनोंदणी, प्रथम नोंदणी तसंच नुतनीकरण यासाठी खुले केले आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख 31 ऑगस्ट आहे. एकवेळ नोंदणीसाठीचा 14-अंकी क्रमांक आधार क्रमांकाच्या आधारे जारी केला जातो आणि तो शिष्यवृत्तीसाठी अर्ज करण्यासाठी गरजेचा आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार ज्या विद्यार्थ्यांना एक वेळ नोंदणी क्रमांक मिळाला आहे ते थेट राष्ट्रीय शिष्यवृत्ती पोर्टलवर शिष्यवृत्तीसाठी अर्ज करू शकतात.

**<u>छत्तीसगड माओवादी</u>**

छत्तीसगडमध्ये काल सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत नारायणपूर जिल्ह्यात पाच माओवादी ठार झाले. महाराष्ट्राच्या सीमेलगत असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांवर माओवाद्यांनी हल्ला करत बेछूट गोळीबार केला. सुरक्षा दलांनी दिलेल्या प्रत्युत्तरादाखल पाच माओवादी ठार झाले. दरम्यान, सुरक्षा दलांनी राज्यातील सुकमा जिल्ह्यातील विविध भागातून नऊ माओवाद्यांना अटक केली तर सुकमा जिल्ह्यात एका महिलेसह दोन माओवाद्यांनी शरणागती पत्करली आहे.

**<u>आसाम पूर</u>**

आसाममध्ये पूरस्थिती आणखी गंभीर झाली आहे. 28 जिल्ह्यांतील 11 लाखांहून अधिक लोकांना पुराचा फटका बसला असून पुरामुळे मृतांची संख्या 38 वर पोहोचली आहे. राज्यातील 84 महसुली मंडळातील 2 हजार 208 गावांचं पुरामुळे मोठं नुकसान झालं असून 42 हजार हेक्टर क्षेत्रावरील पिकांचंही नुकसान झालं आहे. ब्रह्मपुत्र, बराक आणि त्यांच्या सर्व उपनद्या धोक्याच्या पातळीवरून वाहत आहेत. राज्य सरकारनं 140 मदत शिबिरं आणि 359 पुनर्वसन केंद्र उघडली आहेत.

**<u>मॉन्सून</u>**

नैऋत्य मॉन्सूननं संपूर्ण देश व्यापला असून आज मॉन्सून राजस्थान, हरियाणा आणि पंजाबच्या उर्वरित भागांमध्ये पुढे सरकला असून येत्या चार ते पाच दिवसांत वायव्य, पूर्व आणि ईशान्य भारतात अधिक सक्रिय होण्याची दाट शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**<u>युरो करंडक</u>**

युरो कप अर्थात युरोपीय फुटबॉल विश्वकरंडक स्पर्धेमध्ये काल रात्री तुर्कस्ताननं जर्मनीला 2-1 नं पराभूत करून स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. आता शेवटच्या आठ संघांमध्ये पोहोचलेल्या तुर्कस्तानचा सामना रविवारी नेदरलँडशी होणार आहे. तत्पूर्वी नेदरलँड्सने काल रात्री रोमानियावर 3 - शून्य असा लक्षणीय विजय मिळवत 16 वर्षांत प्रथमच उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. डच संघाला 2008 नंतर प्रथमच स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करणं शक्य झालं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.